95

Interdisciplinary National Level Conference 17 th Mar.2018
Special Issue On Impact of Globalization on Language, Literature, Education, Social Sciences, Library, Environment, Sports And Games

| Organised By | Rayat Shikshan Sanstha's Prof.Dr.N.D.Patil Mahavidyalaya,Malkapur(Perid) | ISSN 2349-638x Impact Factor 4.574 |
|---|---|---|

# जव्हारकर मुकणे व पेशवे संबंध

प्रा.डॉ.चंद्रकांत शिवराम गिरी
चंद्राबाई शांताप्पा शेडूरे कॉलेजहुपरी

प्रस्थावना

जव्हार संस्थानचा मूळ संस्थापक देवराम उर्फ जयबा मुकणे हा एक आदिवासी राजा होता. त्याला धुळबाराव व होळकरराव अशी दोन मुले होती. जयबा मुकणेचा मृत्यू इ.स. १४०० मध्ये झाला. जयबाच्या मृत्यूनंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र धुळबाराव राजा झाला. श्री. सदानंद महाराज धुळबास आपला धर्मपुत्र मानीत असत. जयबा मुकणे यांची दोन्ही मुले अत्यंत शूर होती. त्यापैकी धुळबाराव राजा झाला.

मोगलांनी उत्तर कोकणातील मुकणे घराण्याचे अधिपत्य मान्य केले. दि. ६ जून १३४२ रोजी दिल्लीच्या बादशहाने मुबारक खिलजीने धुळबाराव मुकणेस 'राजा' ही पदवी बहाल करुन नेमशहा या नावाने त्याला जव्हारच्या गादीवर बसविण्यात आले. धुळबारावाच्या काळात जव्हारच्या ताब्यात बावीस किल्ले होते. त्यापैकी पाच किल्ले हे अहमदनगर जिल्ह्यातील होते. त्याची हद्द पेठ, धरमपूर ते हरीचंद्रगडापर्यंत होती. जव्हारच्या राज्याचा त्यावेळचा एकूण वार्षिक महसूल नऊलक्ष रुपये इतका होता.[1] यावेळी महमंद तुघलक हा दिल्लीच्या तख्तावर राज्य करीत होता. त्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्याचे प्रयत्न सुरु केले होते. तेव्हा त्याने दक्षिण भारतावर स्वारी करण्याचे ठरवून इ.स. १३४३ मध्ये उत्तर कोकण प्रांतातील जव्हार संस्थानावर स्वारी केली. उत्तर कोकणातील माहिम, जव्हार आणि संगमेश्वर ही लहान हिंदू राज्य देवगिरीच्या यादवांच्या पाडावानंतरही काही काळ टिकून होती.[2] सह्याद्रीच्या आश्रयाने जव्हारचे राजे सुलतानाच्या अफाट फौजांशी झुंज देत होते.

धुळबाराव उर्फ नेमशहा राजाने आपल्याकडे असलेल्या साधन सामुग्रीनिशी व आपल्या सैन्याच्या जोरावर महमंद तघलकाशी निकराचा लढा दिला होता. परंतु दिल्लीच्या प्रचंड सैन्यापूढे धुळबाराव उर्फ नेमशहा याच्या सैन्यास अखेर हार खावी लागली. महमंद तघलकाने धुळबास कैद करुन तघलखाबादच्या किल्ल्यात नजर कैदेत ठेवले. महमंद तघलकाबरोबर झालेल्या संघर्षात जव्हार संस्थानचे फार मोठे नुकसान झाले. बिकटकाळात झालेल्या जव्हार संस्थानची घडी त्यांचे धाकटे बंधू होळकरराव यांनी बसविण्याचा प्रयत्न केला. आपल्या ज्येष्ठ बंधूला पकडून नेल्यानंतर निराश न होता आपल्या संस्थानावर आलेल्या कठीण प्रसंगाला होळकररावांनी खंबीरपणे तोंड दिले. होळकरराव आपल्या ज्येष्ठ बंधूच्या नावाने राज्य करीत असले तरी त्यांचे मन जव्हारच्या राज्यकारभारात मुळीच रमत नव्हते.

आपल्या ज्येष्ठ बंधूची सुटका कोणत्या मार्गाने करावी या संधीची होळकरराव वाट पहात होते. एक दिवस संधी साधून नाशिकच्या परिसरात राहणाऱ्या महमंद तघलकाच्या सुभेदारावर आपल्या सैन्यासह स्वारी करुन त्याला त्रास देण्यास सुरुवात केली व आपल्या ज्येष्ठ बंधूची त्वरीत सुटका करा अशी मागणी केली.[3] होळकररावाचा हा त्रास नाशिकच्या महमंद तघलकाच्या सुभेदारास सहन होत नव्हता. कारण महंमद तघलकाचा सुभेदार मातब्बर खान सय्यद हा एक अरब सरदार कल्याणास वस्ती करुन राहिलेल्या एका कुटुंबातला होता. तो प्रथम नाशिक जिल्ह्याचा ठाणेदार असून मावळे, आदिवासी कोळी, भिल्ल इत्यादी लोकांत लहानपण पासून मिसळणारा असल्यामुळे त्याला त्या (जव्हारसारख्या) डोंगराळ प्रदेशाची चांगली माहिती होती.[4] तेव्हा सुभेदाराने महमंद तघलकास खलीता पाठवून धुळबारावाचा कनिष्ठ बंधू होळकरराव आपणांस सदैव त्रास देत असून मला जव्हार व नाशिक सारख्या डोंगर दऱ्यांच्या नद्यानाल्याच्या जंगलव्याप्त प्रदेशात बंदोबस्त ठेवणे फार अवघड व अत्यंत कठीण झाले आहे. तेव्हा आपल्या नजरकैदेत असलेल्या धुळबाराव उर्फ नेमशहास आपल्या नजरकैदतून सोडून दिलेतर आपल्या सैन्याला होणारा त्रास कमी होईल असे त्याने महमंद तघलकास कळविले होते. जव्हार व नाशिक प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती महमंद तघलकास माहित होती. म्हणून नाशिकच्या सुभेदारांने पाठविलेल्या खलित्यावर विचार करुन त्याच्याशी दोस्तीचा तह करणे योग्य आहे असे त्याला वाटले म्हणून ५ जून १३४३ रोजी महमंद तघलक व धुळबाराव उर्फ नेमशहा याच्यांत एक तह झाला.[5] धुळबाराव उर्फ नेमशहा यांना याच दिवशी महमंद तघलकाने 'शहा' हा किताब दिला. जव्हार व अहमदनगर जिल्ह्यासह २२ किल्ले व नऊ लाख रुपये वार्षिक वसुलीचा मुलूख तोडून दिला[6] आणि त्याला स्वातंत्र्य दिले. त्याची जव्हार संस्थानात सन्मानाने रवानगी केली ही गोष्ट जव्हारच्या इतिहासात फार महत्वाची मानली जाते. तेव्हा पासूनच या महादेव कोळी घराण्यात 'शहा' हा किताब लावला ( महमंद तघलकाने धुळबारावास दिलेला ताम्रपट हा पार्शियन भाषेत असून त्यावर महमंद तघलकाची सही आहे. तो ताम्रपट जव्हार राजघराण्याकडे आजही आहे.) तेव्हा पासून धुळबाराव उर्फ नेमशहाने जव्हार संस्थानात आपला एक स्वतंत्र 'शक' सुरु केला. शालिवाहन राज्याच्या स्मृतीप्रित्यर्थ असलेल्या शालिवाहन शकाप्रमाणे हा 'जव्हार शक' सुरु झाला. त्याचा वापर संस्थानच्या कागदोपत्री होऊ लागला.जव्हारचे राजे आपल्या नावापुढे 'शहा' हे बिरुद लावत होते. गादीवर बसतांना पायात सोन्याचा तोडा घालून सर्व राजचिन्हे उपभोगित, नऊ तोफांची सलामी घेण्याचा अधिकार त्यांना होता.

जव्हार संस्थानात पहिला राजवाडा इ.स. १७५० मध्ये तिसरे कृष्णशहा (अकरावे वंशज १७४२-१७५८) यांनी जव्हार येथे बांधला परंतु दुर्दैवाने हा राजवाडा अवघ्या ७२ वर्षांनी म्हणजे इ.स. १८२२ मध्ये अग्नीनारायणच्या भक्षस्थानी पडला.[7] जव्हारच्या गादीच्या वारसा हक्कासंबंधी राज्यात फार मोठी गडाळो माजली होती. याच वादातून बंडखोरांनी तिसरे कृष्णशहांनी बांधलेला राजवाडा जाळला. त्यामुळे

जव्हारच्या राजवाड्यात असलेली पूर्वीची संपत्ती महत्वाचे करार, दानपत्रे पूर्वीची ऐतिहासिक कागदपत्रे जळून खाक झाली. या बहूमोल वास्तूबरोबर राज्याच्या इतिहासाचे केवळ जोते शिल्लक असून त्या जोत्यावरील दगडावरील पुरातन नक्षीवरुन या राजवाडयाची भव्यता सहज लक्षात येते. त्यामुळे इतिहास संशोधकांना जव्हार संस्थानचा पूर्वीचा इतिहास सखोलपणे अभ्यासता येत नाही. अशा जव्हार संस्थानात इ.स.१३४३ ते १९४८ पर्यंत १९ राजे होऊन गेले. त्यातील शेवटचे राजे श्रीमंत यशवंतराव मुकणे हे होते. जव्हार संस्थानचे पोर्तुगीज, मुघल, शिवाजी महाराज, पेशवे, इंग्रज यांच्याबरोबर वेगवेगळ्या कारणांसाठी संबध आले होते.

उत्तर कोकणातील वसईचा किल्ला हा पोर्तुगीज सत्तेचे प्रबळ ठाणे होते. इ.स.१७३९ मध्ये चिमाजी आप्पाने पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेल्या वसईच्या किल्ल्यावर स्वारी केली तेव्हा चिमाजी आप्पाने जव्हारकरांकडे सैन्याची व इतर साधन सामुग्रीची मागणी केली होती. त्याप्रमाणे जव्हारच्या राजांनी सैन्य व मदत पाठवून वसईचा किल्ला जिंकण्यासाठी पेशव्यांना मदत केली होती.[८] पेशव्यांच्या पोर्तुगीजांवरील विजयामुळे उत्तर व दक्षिण कोकणावर मराठयांची सत्ता प्रस्थापित झाली. वसई व ठाणे ही महत्वाची ठाणी मराठयांच्या ताब्यात आली. पेशव्याच्या मदतीच्या वेळी जव्हारच्या राजाकडे वसई, दमण, भिवंडी पर्यंतचा प्रदेश असून त्यात १० किल्ले व साडेतीन लाखांचा मुलूख होता.जव्हारचे राजे पेशव्याचे मांडलिक बनले इ.स. १७३९ ते १७६० या काळात जव्हार राज्य पेशव्यांच्या ताब्यात होते/ गेले पेशव्यानी जव्हारच्या राजावर 'बाबती' व 'सरदेशमुखी' हे कर बसविले.[९] सुरगाणा प्रांत हा जव्हारच्या राज्याच्या शेजारी होता. इ.स.१७५०-५१ मध्ये सुरगाणा प्रांत हा महादेव कोळी लोकांच्या ताब्यात होता. सुरगाणा प्रांतातील १४ महाल व त्यातील किल्ले पेशव्यांनी खालसा केले. तसेच इ.स. १७६० ते १७६१ या काळात महादेव कोळी या आदिवासी जमातीच्या ताब्यात असलेली सत्ताही पेशव्यांनी काढून घेतली या पेशव्यांच्या राजकीय आक्रमणाला उत्तर देण्यासाठी जावजी बांबळे नावाच्या नाईकांने महादेव कोळयाची एक राजकीय संघटना स्थापन केली होती. तेव्हा महादेव कोळयांना वठणीवर आणण्यासाठीच जव्हार आणि डांगच्या सरहद्दीवर सुरगाण्याला पेशव्यांनी कोकणा जमातीच्या पवार देशमुखाची नेमणूक केली होती.

जावजी बांबळे याने जव्हार व शिवनेरीच्या (जुन्नर व मंचर) परिसरातील महादेव कोळी या आदिवासी जमातीला एकत्र केले. परंतु आदिवासाच्या राजकीय संघटनेचे कार्य सुरु होण्या अगोदर सरदार रामजी सावंत याने जावजी बांबळे सह सात प्रमुख महादेव कोळी नायकांना पकडून त्यांचा शिवनेरी किल्यावरुन कडेलोट केला. महादेव कोळी जमातीला पेशव्यांची ही गोष्ट आवडली नाही. म्हणून महादेव कोळी लोकांनी इ.स.१७६२ मध्ये पुन्हा पेशव्याविरुध्द बंड केले. त्यामुळे पेशव्यांना महादेव कोळी जमातीपुढे माघार घ्यावी लागली.[१०] जव्हारचे राजे महादेव कोळी असूनही ते पेशव्याच्या बाजूने होते. हे महादेव कोळयांचे बंड दुसऱ्या पतंगशहाला थांबविता आले नाही. म्हणून पेशव्यांनी जव्हारच्या दुसऱ्या पतंगशहाला दर साल २००० रुपये नजराना द्यावयास लावला होता.[११] इ.स.१७४२ मध्ये विक्रमशहाचे निधन झाले. त्याच्या पहिल्या विधवा पत्नीने (सई कुवरबाई) हिने दत्तक घेतलेल्या मुलास विक्रमशहाच्या धाकटया पत्नीने (कुवारबाई) हिने ठार मारले. हे प्रकरण पेशवे दरबारी गेले. तेव्हा पेशव्यांनी तिसऱ्यांदा म्हणजे इ.स.१७५८ ते १७६१ मध्ये जव्हार राज्याची सर्वसत्ता आपल्या हाती घेतली होती.[१२] इ.स १७८२ मध्ये पेशव्यांनी जव्हारच्या राजाबरोबर तह करार करुन त्यांना १५ ते २० हजाराच्या उत्पादनाचा मुलूख पुन्हा जव्हारकरांच्या ताब्यात दिला.[१३] पेशव्यांनी इ.स.१७९५ मध्ये निजाम अली विरुध्द मोहीम काढली तेव्हा निजाम अली विरुध्दच्या खर्ड्याच्या लढाईत परशुराम भाऊ पटवर्धन यांच्याबरोबर जव्हारच्या कोळी सेनेने ही सहभाग घेतला होता. या मोहिमेत निजामाचा पूर्ण पराभव झाला. पेशव्यांना विजय मिळाला. विजयी घेऊन सर्वसेना पुण्यात आल्यानंतर विजयी विरांचा गणेश महालात सन्मान करुन त्यांना निरोप देऊन पुन्हा जव्हार राज्यात पाठविण्यात आले.[१४] इ.स. १७९८ मध्ये पतंगशहाचे निधन झाल्यावर त्याचा मुलगा विक्रमशहा (तिसरा) हा पेशव्यांच्या सहकार्याने जव्हारच्या गादीवर आला. पेशव्यांच्या सहकार्याबद्दल विक्रमशहाने (तिसरा) तीन हजार रुपये नजराणा पेशव्यांना देऊन त्र्यंबकेश्वरच्या मामलेदारांच्या सहाय्याने जव्हारचे राज्य करण्याचे मान्य केले होते.[१५] इ.स.१८०५ मध्ये भिल्ल जमातीच्या आदिवासी लोकांनी रामनगर या कोळी राज्यात दंगल/ बंड केल्याने पेशव्यांनी तिसऱ्या विक्रमशहास आपल्या लष्करी अधिकाऱ्यांच्या देखरेखेखाली ठेवले होते. तेव्हा सर्व जव्हार राज्य/ संस्थान हे पेशव्यांच्या नियंत्रणाखाली गेले. पेशव्यांनी जव्हारच्या आदिवासी कोळी राज्यावर आपला अंमल प्रस्थापित केला होता.

### संदर्भ

१. Gazetteer of the Bombay Presidency (Fuccimile Reproduction Thane originally printined in १८८२),Volume XIII, Part II, P.४४०
२. पुरंदरे बाबासाहेब, राजा शिवछत्रपती, भारतीय संस्कृती संवर्धन मंडळ, सांगली २००३, पृ.४५
३. मुकणे दयानंद, जव्हार दर्शन, साहित्य कॉर्नर जव्हार, २००४, पृ.२५
४. गर्गे, स.मा. (संपादक), मराठी रियासत, सरदेसाई गोविंद सखाराम, खंड-२, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८९, पृ.१०१
५. चौधरी (डॉ.) क.क., गॅझेटिअर ऑफ द बॉम्बे प्रेसिडेन्सी ठाणे, खंड-१३, भाग २, पृ.७०३
6. Transactions of the Bombay Geographical Society from 1836 to 1838, Bombay American Mission Press T Graham Printer, P.240
७. केतकर श्रीधर व्यंकटेश, महाराष्ट्रीय ज्ञानकोष (ज.), पृ.१९९
८. गारे (डॉ.) गोविंद, सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी आदिम साहित्य पुणे, १९७४, पृ.६३

| Organised By | Rayat Shikshan Sanstha's<br>Prof.Dr.N.D.Patil Mahavidyalaya,Malkapur(Perid) | ISSN 2349-638x<br>Impact Factor 4.574 |
| --- | --- | --- |

९. चोधरी (डां.) के.क., गॅझेटिअर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी ठाणे, खंड-१३, भाग २, पृ.७०४
१०. गारे (डॉ.) गोविंद, सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी आदिम साहित्य पुणे, १९७४, पृ.६८
११. जोशी तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री (संपा),मराठी विश्वकोश खंड-६, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, १९७७, पृ.३५१
१२. चौधरी (डां.) के.के., गॅझेटिअर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी ठाणे, खंड-१३, भाग २, पृ.७०४
१३. दिमोटे गंगाधर अण्णाजी (वकिल ज.संस्थान) कै.श्रीमंत महाराज पतंगशहा राजेसाहेब जव्हार संस्थान यांचे चरित्र, १९१९, पृ.५
१४. मुकणे दयानंद, जव्हार दर्शन, साहित्य कॉर्नर जव्हार, २००४, पृ.४१
१५. दिमोटे गंगाधर अण्णाजी (वकिल ज.संस्थान) कै.श्रीमंत महाराज पतंगशहा राजेसाहेब जव्हार संस्थान यांचे चरित्र, १९१९, पृ.७